ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIII, Issues– III May – June, 2024

OPEN ACCESS Original Research Article

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील अनामवीर

* सौ. रंजना वडेकर

*संशोधक, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई.

Abstract

१५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि १५ ऑगस्ट २०२२ ला भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्ष पूर्ण झाली. देशभर मोठ्या उत्साहात भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा झाला. खरं तर सर्व भारतीयांसाठी हा अभिमानाचा आणि आनंदाचा अविस्मरणीय क्षण आहे. हा अनमोल क्षण साजरा करत असताना देशाच्या स्वातंत्र्यासाठी जे शहीद झाले. ज्यांनी तुरूंगवास भोगला, ज्यांनी तेथे आत्मसमर्पण केले. त्यांच्या या महान त्यागामुळेच स्वातंत्र्य रुपी सूर्याचा उदय झाला. स्वातंत्र्य लढ्यातील या क्रांतिकारकांना नेमकं कोणापासून व कशाचे स्वातंत्र्य हवे होते. हयाचा जाज्वल्य इतिहासही लिहिला गेला मात्र हे काहीच क्रांतिकारकांच्याच नशिबी होते. पण असेही काही अनामवीर होऊन गेले की, त्यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान फार मोठे होते, मात्र त्यांचे कर्तृत्व इतिहासाच्या पानावर कधी उमटलेच नाही. तो इतिहास बेडीबंदच राहिला.

Copyright © 2024 The Author(s): This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

१८५७ च्या उठावापासून ते १९४७ च्या स्वातंत्र्य दिनापर्यंतचा नव्वद वर्षाचा स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास आपण सर्वांनी अभ्यासला आहे. कारण बहुतेक सर्वच इतिहासकारांनी भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासाची यशोगाथा ही इ.स. १८५७ च्या उठावापासून सुरू केली आहे. पण त्याआधीही आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी अनेक लढे झाले. या लढ्याचीची नोंद मात्र इतिहासकारांनी घेतली नाही. कारण हे लढे लढणारे जे शूरसेनानी होते ते निरक्षर डोंगरदऱ्यात राहणारे होते. त्यांना अक्षर ओळख नसल्यामुळे त्यांना त्यांचा इतिहास लिहिता आला नाही. आणि हे त्यांच्या ध्यानीमनीही आले नसेल की, यांची नोंद ठेवावी. पण देशाप्रती असणारी आपली निस्सिम देशभक्ती आणि निष्ठा, प्रेम हे मात्र त्यांचं तसुभर ही कमी नव्हते. स्वातंत्र्य मिळवणे हाच एकमेव ध्यास होता. म्हणून अशा अनामवीरांचे स्वातंत्र्याचे लढे आपल्याला नजरेआड करून चालणार नाही.

इसवी सन १६०० मध्ये व्यापाराच्या निमित्ताने ईस्ट इंडिया कंपनी भारतात आली. अनेक युरोपीय व्यापाराने भारतात जम बसविला.पुढे इसवी सन १८१८ ला पेशवाईचा अस्त झाला आणि महाराष्ट्रात इंग्रजी राजवट प्रस्थापित झाली. गुलामगिरीची चीड असलेल्या मराठ्यांचा सतत दोन वर्ष मराठा-इंग्रज संघर्ष सुरू राहिला. त्यात शिंदे, होळकर, भोसले आणि गायकवाड या मराठी सरदारांनी काही काळ संघर्ष केल्याने पुढे मराठी सत्ता कमकुवत झाली .त्यांनी इंग्रजांचे राजकीय वर्चस्व मान्य केले आणि इंग्रज सत्तेचा महाराष्ट्रातील मार्ग मोकळा झाला. आणि सबंध देशावर

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIII, Issues– III May – June, 2024
OPEN ACCESS Original Research Article

इंग्रजांचे वर्चस्व निर्माण झाले. पण त्याही आधी जेव्हा ईस्ट इंडिया कंपनी भारतात आली तेव्हा बंगालपासून तिला प्रखर विरोध करण्याचे काम सर्वप्रथम कोणी केलं असेल तर आपल्या भारतातील अनेक अनुसूचित जमातीतील शूरवीरांनी केले.

" सतराव्या शतकापासून ते विसाव्या शतकापर्यंत भारतात ठिकठिकाणी हिंदुस्थानच्या राजसत्तेला, जुलमी सत्तेला व इंग्रजी व्यापार सत्तेला आव्हान देण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्यात बागदी, होउई, खैरा, माश्ती, चकमा, भिल्ल, पावरा, गोंड, संताळ, हूॅं ,ओरॉन, मुंडा, खोड, सहारिया, महादेव कोळी, कोल या जमाती आघाडीवर होत्या."१ आपल्या आध्यात्मिक परंपरा, विशिष्ट संस्कृती आणि उदात्त जीवनमूल्यांसह भारतातील आदिवासी समाज हा नेहमीच भारतीय सभ्यता आणि संस्कृतीचा अविभाज्य भाग राहिला आहे. पण देशाच्या सुरक्षेवर जेव्हा-जेव्हा संकट आले तेव्हा तेव्हा आदिवासी समाजाने आपल्या शौर्याने आणि बलिदानाने राष्ट्ररक्षणात महत्त्वाचे योगदान दिले आहे.जेव्हा ब्रिटीश राजवटीने भारतात आपल्या साम्राज्याचा विस्तार करण्यास सुरुवात केली, तेव्हा त्यांच्यासमोर पहिले आणि सर्वात शक्तिशाली आव्हान होते. ते जंगल-निवास क्षेत्रांचे होते. आदिवासी समाजाने इंग्रजांचे अधिपत्य कधीही मान्य केले नाही . आपल्या देशाला ब्रिटिश सत्तेच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी ब्रिटिश सत्तेविरुद्ध वेळोवेळी ठिकठिकाणी मोठमोठे सशस्त्र बंड पुकारले आणि संघर्ष केला. त्यात पुरुषांबरोबर आदिवासी स्त्रियांचाही मोठा सहभाग होता. स्त्रियांच्या दृष्टीने पाहिलं तर तो काळ झाकलेल्या पालखीचा होता; पण अशा काळात आदिवासी स्त्रियाही कुठे मागे नव्हत्या. स्वातंत्र्य लढ्यात त्या नेहमीच अग्रभागी होत्या.

तिलका मांझी, भागोजी नाईक, रामजी भांगरे, रामा किरवा,राघोजी भांगरे, बिरसा मुंडा, उमाजी नाईक, तंट्या भिल्ल, सत्तू मराडे, कोंडाजी नवले,, बाबुराव शेडमाके, गोंडराजे शंकर शहा, रघुनाथ शहा,राया ठाकूर, होन्या केंगले, कुॅंवरसिंग वसावा, खाज्या नाईक, विरांगणा नागाराणी गायडिनल्लू, राणी झलकारी, राणी दर्गावती, उमाठ्या वसावा, अशा शेकडो नव्हे तर हजारो आदिवासी क्रांतिकारकांनी आपल्या जीवाची पर्वा न करता इंग्रजांना कडाडून विरोध केला. आपल्या देशात "इंग्रजांनी पाय रोवण्यापूर्वी सन १७७० पासूनच आदिवासींनी लढा देण्यास सुरुवात केली होती. त्यामध्ये १७७०-७१ मध्ये कंपनी सरकारच्या विरोधात जयनाथ सिंग या आदिवासीने बिहारमधून उठाव केला होता.

त्यातूनच पुढे सन १७७८ साली बिहारमधील पहाडी सरदारांचा इंग्रजांविरुद्ध संघर्ष झाला, भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील पहिले सेनानी म्हणून ज्यांची गणना केली जाते. ते क्रांतिकारक 'तिलका माझी' होय. यांनी १७७१ ते १७८४ असे जवळजवळ चौदापंधरा वर्षे ब्रिटिशांविरुद्ध बंड केले. इंग्रजांनी त्यांना १३ जानेवारी १७८४ ला भागलपूर येथे फाशी दिले.

सन १७८४-८५ मुंबई राज्यातील आदिवसींचा आणि इंग्रज, सावकरांविरुद्ध संघर्ष. छोटा नागपूरमधील 'तमाड' जमातीचा संघर्ष सन १७८६ साली झाला. बिहारमधील 'जोरो' जमातीचा संघर्ष सन १७९५-१८०० मध्ये झाला. स्वातंत्र्यासाठी लढलेला धर्मयोद्धा 'राजा केरळ वर्मा पद्मसी'

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIII, Issues– III May – June, 2024
OPEN ACCESS Original Research Article

यांचा कालखंड सन १७९७ ते १८०५ होय. या महान क्रांतिकारकाने नऊ वर्षे इंग्रज सरकारच्या विरोधात लढा दिला. अखेर त्याचा मृत्यू ३० सप्टेंबर १८०५ रोजी म्हैसूर मानाटोली येथे झाला. आंध्र प्रदेशातील पूर्व गोदावरी जिल्ह्यातील 'कोया' जमातीचा संघर्ष सन १८०३ तर गुजरातमधील भिल्ल जमातीचा संघर्ष सन १८०९ ते १८२८ ला झाला. केरळमधील सन १८१२ चा 'कुरुचिया' जमातीचा संघर्ष हा सुद्धा एक महत्त्वपूर्ण लढा होता. १८१२ ते १८१९ मध्ये खानदेशात भिल्ल जमातीने ब्रिटिश राजवटीविरुद्ध विरोध केला.

महाराष्ट्रामध्ये 'महादेव कोळी जमातीचा व भिल्लांचा पहिला उठाव सन १८१८ मध्ये नांदगाव (नाशिक) जवळ मांडवद येथे झाला. या उठावाचे नेतृत्व नगर जिल्ह्यातील महादेव कोळी जमातीच्या 'रामजी भांगरा' व रामा किरवा यांनी केले. त्याचे लोन पुणे, नाशिक, अहमदनगर जिल्ह्यांत पोहचले. याचा परिणाम लोक संघटित होऊ लागले. सन १८३० साली जुन्नर (पुणे) प्रांतातील आदिवासींनी दुसरा उठाव केला. त्याचे नेतृत्त्व भाऊ खरे, चिमाजी दरबारे आणि अप्पा जाधव यांनी केले. त्यात ५४ आदिवासींना प्राणास मुकावे लागले. सन १८१८ साली असाच एक महान क्रांतीकारकाने बंडाला आपल्या वडिलांच्या मार्गावरून सुरुवात केली. परंपरेने वतन आपल्याकडे आले खरे, परंतु त्याच वेळी इंग्रजांनी त्यांची वतनदारी बंद केली. म्हणून या क्रांतिकारकाने प्रदीर्घ असा संघर्ष केला. अशा महान क्रांतिकारकाचे नाव 'उमाजी नाईक' होय. त्यांच्या संघर्षाची तेरा वर्षे म्हणजे एक जाज्वल्य दशक मानले गेले आहे. सन १८३२ पर्यंत त्यांचा लढा चालू होता. अखेर ३ फेब्रुवारी १८३२ रोजी पुण्याच्या शुक्रवार पेठेतील एका झाडावर त्यांना फाशी दिली गेली. अशा प्रकारे एका महान क्रांतिकारकाचा अंत झाला."२

'उमाजी नाईक' हे भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासातील एक सोनेरी नाव आहे. उमाजी नाईकांइतका इंग्रजांना हादरा बसविणारा दुसरा लढा कोणी दिला नव्हता. उमाजींचा बंदोबस्त करणे इंग्रज सत्तेला गरजेचे होते, म्हणून रॉबर्टसन या इंग्रज अधिकाऱ्याने उमाजीला पकडण्यासाठी जाहीरनामा काढला त्याबरोबर खास पुना हॉर्स या घोडदळाची स्थापना केली होती. पुढे उमाजी नाईकांना पकडण्यात आले आणि उमाजी नाईकांचा इंग्रजांविरुद्धचा तेरा वर्षाचा संघर्ष संपला.

शेवटी त्यांना फाशी देण्यात आली. इंग्रजांचे हे सत्र पुढे असेच चालू राहिले.

८ नोव्हेंबर १८०५ साली महाराष्ट्रातील देवगाव, तालुका अकोले, जिल्हा अहमदनगर या ठिकाणी एका आदिवासी क्रांतिकारकांच्या कुटुंबात जन्मलेले राघोजी भांगरे यांना क्रांतीचे बाळकडू त्यांना आपल्या बालवयातच आजोबा वालजी भांगरे व वडील रामजी भांगरे यांच्याकडून मिळाले. इंग्रजांचे जुलूम, सावकार, वाणी यांची दडपशाही अशा अनेक गोष्टी बालपणापासून राघोजी बघत आले होते. पुढे वडिलांना काळ्यापाण्याची शिक्षा झाल्यानंतर राघोजीने महादेव कोळ्यांची मोठी टोळी उभारून नाशिक आणि अहमदनगर जिल्ह्यात धुमाकूळ घातला. जनतेवर दडपशाही करणारे सावकार, मारवाडी, वाणी यांचे कान नाक कापून टाकले. असा उल्लेख इंग्रज लेखक हार्डिमन यांच्या प्रबंधात आहे.

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIII, Issues– III May – June, 2024
OPEN ACCESS Original Research Article

१८४८ साली महात्मा जोतीराव फुले ब्रिटिश सरकारकडे शिक्षणाचा आग्रह धरत होते. त्याचवेळी महाराष्ट्रातील क्रांतिकारक राघोजी भांगरे आपल्या अस्तित्वाची लढाई लढत होते. मग अशा दोन नायकांचा एकमेकांशी संबंध कोठे तरी आला किंवा नाही याचा शोध घेत असतांना महात्मा जोतीराव फुले आपल्या चरित्रात पान क्र. १६ वर असे नमूद करतात की, "मी विद्यार्थी दशेत असतांना सन. १८३९ ते १८४६ या काळात इंग्रजांविरुद्ध ज्यांनी लढा दिला त्यात क्रांतिकारक राघोजी भांगरे, बापू भांगरे यांनी नेतृत्व केले. अखेर २ मे १८४८ ला राघोजी भांगरे यांना ठाणे येथे फासी देण्यात आली, हे सर्व निधड्या छातीचे देशवेढे देशभक्त होते. तथा त्यांनी अधूनमधून केलेली ती बंडे निष्फळ होणार हे ठरल्यासारखे होते. त्या बंडामध्ये अनेक देशभक्त धरातीर्थी पडले होते, हे मी जाणत होतो. तरी ही मी मित्रांच्या साह्याने ब्रिटीशांचे राज्य उलथून पाडण्याचे व आपला देश स्वातंत्र्य व बलवानं करण्याचे ध्येय उराशी बाळगले होते. " (The revolt raised by bapu and raghoji bhangre was suppressed in 1848. Raghoji bhangre hanged on 2 may 1848. They were daring and fanatical patriots, but their stray attempts were foredoomed to failure. Although joti saw those patriots perish in the throw the british out and make his country free and great." Page No. 16) "३

असा उल्लेख महात्मा फुले यांच्या चरित्रात पाहायला मिळतो. तसे पाहिले तर सर्व जगाच्या इतिहासात सन १८४८ हे वर्ष एक महान क्रांतिकारक वर्ष ठरले. महाराष्ट्रामध्ये अहमदनगर जिल्ह्यातील आद्यक्रांतिकारक 'राघोजी भांगरे' यांचे इंग्रजाविरुद्धचे बंड १८४० ते १८४८ पर्यंत चालू होते. त्यांना अखेर २ मे १८४८ साली ठाण्याच्या मध्यवर्ती कारागृहात फाशी देण्यात आली. आजही त्या ठिकाणी या महान क्रांतिकारकाचा क्रांतीस्तंभ उभा आहे.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या लाखो आदिवासी क्रांतिकारकांचा इतिहास इथल्या अभिजन वर्गाने राष्ट्रीय चळवळीच्या परिघाबाहेर ठेऊन दुर्लक्षित केले. १८५७ च्या उठावातील राणी लक्ष्मीबाईच्या शौर्याचे गीत गायले जाते. शुभद्रा कुमार चौहान यांची प्रसिद्ध कविता

"मचा झाँसी में घमासान, चहुँ ओर मची किलकारी थी
अंग्रेजों से लोहा लेने, रण में कुदी झलकारी थी
खूब लड़ी मर्दानी वो तो झाँसी वाली रानी थी
बुन्देले हरबोलों के मुँह हमने सुनी कहानी थी"

झाशीच्या राणीचे शौर्य, पराक्रम, धाडस यांचा देशभर गौरव होणे साहजिक आहे. पण खरेच १८५७ च्या उठावात इंग्रजांच्या विरुद्ध झाशीची राणी लढली होती का ? धारातीर्थी पडली होती का ? बद्री नारायण यांच्या 'दलित वीरांगणाएँ एवं मुक्ती की चाह' या संशोधनपर ग्रंथातील हा उतारा पाहा.

"एक झलकारी कोरिन थी। उसके नयन-नक्श, उसकी नासिका की उठान, उसकी आँखों की रंगत, उसकी चमडी का रंग और उसकी कद-काठी रानी से बिल्कुल मिलती-जुलती थी। रानी उसे बहुत पसन्द करती थी। उसके पती का नाम पूरन कोरी था। वह लक्ष्मीबाई की सेविका न होकर उसकी अन्तरंग सखी की तरह थी । उसने रानी से धनुष्य-विद्या, मल्ल-युद्ध और निशाना लगाना मीखा। बाद में वह

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIII, Issues– III May – June, 2024
OPEN ACCESS Original Research Article

रानी द्वारा गठित नारी-सेना में शामिल हो गई। झलकारी ने अपने पति को रानी और देश के लिए लड़ने-मरने के लिए प्रेरित किया। बाद में यह एक तोपची बन गया और किले के मुख्य फाटक पर तैनात कर दिया गया, जब रानी लक्ष्मीबाई ब्रितानियों का मुकाबला करने निकली तो ब्रितानी उसका पिछा करके उसे घेरने की कोशिश करने लगे। यह देखकर झलकारी रानी का भेष बनाकर ब्रितानी सेनापति जनरल रोज की तरफ झपटी जनरल रोझने झलकारी को ही रानी समझ लिया और उसे गिरफ्तार कर लिया। इस तरह रानी लक्ष्मीबाई ब्रितानियों का घेरा तोड़कर बच निकलने में सफल हो गई। एक सप्ताह तक धोखे में रहने के बाद आखिर ब्रितानियों को अहसास हुआ कि झलकारिबाई असली रानी नहीं थी, इसलिए उसे छोड़ दिया गया। (पेज १२४)"

त्याच ग्रंथात डी.सी. दिनकर या संशोधकाने पुढे जाऊन राणी झलकारीचे आणखी एक सत्य जगापुढे आणले आहे.

"राणी लक्ष्मीबाई को स्वतंत्रता आंदोलन की शहीद के रूप में याद करना अनैतिहासिक होगा। बहुत से इतिहासकार यह स्थापित करने की कोशिश करते है कि राणी लक्ष्मीबाई १६ जून, १८५८ को अंग्रेजों के खिलाफ लड़ते हुए मारी गई थी। लेकिन सच्चाई यह है कि रानी प्रतापगढ़ के महाराजा की मदद से उपनिवेशीय सेना से बच निकली थी और नेपाल तराई के घने जंगलो में जाकर भूमिगत हो गई थी। वास्तव में, वह लम्बे समय तक जीवित रही और उसकी मृत्यू ८० वर्ष की उम्र में हुई। (पान १२८, १२९)" ४

राणी लक्ष्मीबाईंच्या शौर्याच्या कहाण्या देशभर पसरल्या पण, प्रत्यक्ष इंग्रजांशी लढणाऱ्या राणी झलकारीचा गौरव तर सोडा, साधा उल्लेखही इतिहास येत नाही. कारण ती आदिवासी जमातीतील होती,पण ती शूर,पराक्रमी आणि प्रामाणिक महिला होती. याच आदिवासी झलकारीने राणी लक्ष्मीबाईंचा वेश परिधान करून इंग्रजांना राणी म्हणून भासवले. पुढे झलकारीने आठ दिवस इंग्रजांशी निकराने लढा दिला. पण हे शौर्य दाखविले नसते तर राणी लक्ष्मीबाईंना ब्रिटीशांना गुंगारा देता आलाच नसता.

आदिवासी पराक्रमाच्या इतिहासातील एक वादळी व्यक्तिमत्त्व म्हणजे तात्या उर्फ तंट्या भिल्ल होय. मध्यप्रदेशातील निमाड जिल्ह्यात पोखर या गावी इ.स. १८४२ मध्ये त्यांचा जन्म झाला. इ.स. १८७८ ते १८८९ हा काळ तंट्या भिल्लच्या कर्तबगारीने विशेष गाजला. त्याच्या धाडसी आणि लढाऊ वृत्तीमुळे लोक त्यांना त्यांची तुलना रॉबिनहुडशी करू लागले. हे जातीव्यवस्थेचे गुन्हेगार होते. पण माणूस धर्माचा ते एक आदर्श पुरुष होते. लहानपणातच भाला फेकणे, धनुष्यबाण चालविणे या गोष्टी शिकले होते. निम्म्या वयापर्यंत ते शेती करत होते. पण सरंजामशाहीने त्यांचे शेत बळकाविण्याचा प्रयत्न केल्यावर तंट्या भिल्ल चवताळले व सरंजामशाही मोडीत काढण्यावरच त्याने भर दिला. जंगलात टोळी तयार करून सरंजामशाहीविरुध्द शह देण्यास सुरुवात केली. "क्रांतिकारक 'तंट्या भिल्ल' यांनी इंग्रज, दलाल, सावकार, जमीनदार यांच्या विरोधात दहा ते अकरा वर्षे आंदोलन उभारले त्यांनाही पकडून पुढे ४ डिसेंबर १८८९ रोजी जबलपूर रेल्वे स्टेशन जवळ फाशी देण्यात आली. "५

अशाप्रकारे आपल्या भारतात ब्रिटिश येण्याआधी पुरोहित, वतनदार, सरंजामदार, सावकारशाही यांचे वर्चस्व सामान्य जनतेवर अफाट होते. त्याचबरोबर परकीय आक्रमणे हया

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIII, Issues– III May – June, 2024
OPEN ACCESS Original Research Article

सगळ्यांमुळे भारतीय जनता ही आर्थिक शोषण, गुलामी, दडपशाही या महाभयानक जोखडात अडकून पडली होती. त्यांना न्याय मिळत नव्हता. तसेच भोळ्या भाबड्या जनतेला देवधर्माच्या आणि कर्मकांडाच्या विळख्यात अडकवून घेतले जात होते. जातीव्यवस्थेचा फास क्षुद्रअतिक्षुद्रांच्या गळ्यात अडकवला होता. देशी-विदेशी अशा दोन्ही शोषकांविरुद्ध या क्रांतिवीरांनी मोठया धैर्याने लढे उभारले. संपूर्ण स्वातंत्र्य हेच या क्रांतिकारकांचे मुख्य ध्येय होते.

झारखंड मधील महानायक 'बिरसा मुंडा' यांनी १८९५ साली आंदोलनाला सुरुवात केली. २४ डिसेंबर १८९९ ला रांची छावणीवर हल्ला करून इंग्रजांचा पराभव केला त्यावेळी अर्थातच इंग्रजांची झोप उडाली होती. बिरसा बरोबर समोरासमोर चार हात करता येत नाही म्हणून पोलीस अधिक्षकांच्या नेतृत्वाखाली डोलवाडा गावातच सामूहिक हत्याकांड आणि बलात्काराचा तांडव केला. आणि त्यामध्ये बिरसाची अनेक माणसे मारली गेली. पुन्हा असे हत्याकांड घडू नये म्हणून बिरसा स्वतः पोलिसांच्या स्वाधीन झाले. अशा स्वातंत्र्यप्रिय महानायकाचा ९ जून १९०० रोजी सकाळी तुरुंगातच रहस्यमय मृत्यू झाला. तरीही बिरसाचे आंदोलन पुढे चालूच राहिले क्रांतिकारक गोविंद गुरु यांच्या नेतृत्वाखाली १९०३ ते १९०८ हया कालखंडात स्वातंत्र्यसंग्राम चालूच

होता. "६ अशा प्रकारे देशावर ज्या ज्या वेळी परकीय आक्रमणे झाली त्या सर्वांना शह देणारा समाज हा देशातला लढवाय्या आदिवासीच होता. त्यांचे उठाव इतके विलक्षण होते की, त्यातून प्रेरणा घेऊन अशा अनेक उठावांचे सत्र संपूर्ण भारतभर पसरले. देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत आदिवासी क्रांतिकारकांनी ठिकठिकाणी आपले लढे चालूच ठेवले. परंतु प्रस्थापित इतिहासकारांनी १८५७ च्या उठावालाच भारतीय स्वातंत्र्याचा पहिला उठाव म्हणून त्याला गौरविण्यात आले . आणि यापूर्वीच्या आदिवासींचे लढे हे अनभिज्ञच राहिले, असे स्वातंत्र्याचे कितीतरी बंड दुर्लक्षित ठेवले .आणि अजूनही दुर्लक्षितच आहेत .

आदिवासी समाजातून देशाच्या स्वातंत्र्यासाठी वैयक्तिक बलिदानांची अशी एक प्रदीर्घ मालिकाच पाहायला मिळते. हजारो आदिवासी क्रांतिवीरांची नावे आहेत ज्यांच्या बलिदानाची इतिहासाच्या पुस्तकाने नोंद घेतली नाही. आजही अशी अनेक लोकगीते आणि कथा आदिवासी समाजात प्रचलित आहेत की त्यातून इंग्रजांशी झालेला संघर्ष अधोरेखित करतात. हा आदिवासी समाजाच्या इतिहास आज जरी मौखिक असला तरी इथून पुढे मात्र त्यांना लिखित स्वरूपात वाचायला मिळेल हे मात्र शाश्वत सत्य आहे.कारण अशा अनामवीरांच्या त्यागाचा बलिदानाचा इतिहास आज प्रकाश झोतात आणला जातोय. आजच्या पिढीला अर्थात विद्यार्थी वर्गाला खरा इतिहास कळावा त्या क्रांतिकारकांची ओळख व्हावी म्हणून पाठ्यपुस्तक मंडळांनीही हया वीरांच्या गाथा पाठ्यपुस्तकात आणल्या आहेत. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधत भारतातील सर्व विद्यापीठांमध्ये भारत सरकारने 'स्वातंत्र्य लढ्यातील अनुसूचित जमातीतील क्रांतिकारकांचं योगदान' या विषयावर मोठ्याप्रमाणात चर्चा सत्रांचं आयोजन करण्यात आले होते. त्यात त्यांनी शंभरहून अधिक आदिवासी

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIII, Issues– III May – June, 2024

OPEN ACCESS Original Research Article

क्रांतिकारकांचा गौरवशाली इतिहास आजच्या तरुण पिढीपुढे आणला. ही खूप मोठी गौरवास्पद बाब आहे. आणि खऱ्या अर्थाने आता या अनामवीरांच्या बलिदानाचे सार्थक झालं असं म्हणता येईल. म्हणून अशा अनामवीरांना पुन्हा एकदा शतशः नमन .

जयहिंद!

संदर्भसूची:

१. गारे गोविंद, आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ, सुगावा प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती १९९३. पृष्ठ क्र. १३८, १३९.

२. झांबाडे पी.सी. स्वातंत्र्य लढयातील आद्य क्रांतीनायक, सह्याद्री प्रकाशन कल्याण ठाणे ,प्रथमावृत्ती २ मे २०१०. पृष्ठ क्र. १२.

३. तत्रैव पृ. क्र.२२,२३.

४. लोहकरे संजय, आदिवासी विचारवेध, अक्षता प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती २०२१ पृ. क्र.१४३,१४४.

५. उनि. स्वातंत्र्य लढयातील आद्य क्रांतीनायक, पृ. क्र. १४.

६. उनि. स्वातंत्र्य लढयातील आद्य क्रांतीनायक पृ.क्र. १४.

Cite This Article:

सौ. वडेकर रं. *(2024). भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील अनामवीर.* ***In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal: Vol. XIII (Number III, pp. 91–97). AMIERJ.*** *https://doi.org/10.5281/zenodo.12974328*